नि. फौ. ख. क्र.२५९/२०१५ निशाणी क्र.२४

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव — प्रज्ञा अनिल सरकटे

वय — ३५ वर्षे, व्यवसाय – घरकाम

पत्ता — रा. अकोला, ता. व जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री के. एस. ताकवाले यांचेमार्फत दुपारी ०३.१५ वाजता सरतपास सुरुः**

१. मी आरोपीला ओळखते, ते नात्याने माझे जेठ आहेत. घटना दि. २८.०५.२०१५ रोजी सकाळी ११.४५ वाजताची असून त्यावेळी माझे सासू–सासरे, पती आणि मी स्वतः आमच्या घरामध्ये हजर होतो. त्यावेळी माझे जेठ नामे अजय सरकटे हे आले व त्यांनी त्यांच्या आईचे बँक पासबुक मागितले. त्यावर माझे पती त्यांना असे म्हणाले की, कर्ज काढण्यासाठी आईच्या नावाचे पासबुक देत नाही. त्यावर अजय सरकटे यांनी वाद घातला. त्यांनी घरामध्ये जावून लोखंडी रॉड आणला, माझ्या पतीच्या डोक्यावर आणि पाठीवर मारुन जखमी केले. तो रॉड त्यांनी तेथेच टाकून दिला आणि चालले गेले. त्यानंतर आम्ही उरळ पोलीस स्टेशन ला गेलो, त्यांनी आम्हाला दवाखान्यात जाण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही दवाखान्यातून आल्यानंतर पोलीस स्टेशन, उरळ येथे माझ्या पतीने अजय सरकटे यांच्या विरुध्द रिपोर्ट दाखल केला. रिपोर्ट दाखल केला त्यावेळी मी स्वतः माझ्या पतीसह पो.स्टे., उरळ येथे हजर होते. मी माझ्या पतीची सही ओळखते.

२. आता मला दि.२८.०५.२०१५ रोजीचा रिपोर्ट दाखविण्यात आला त्यावर माझे पती अनिल भगवान सरकटे यांची सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येत आहे. आता मला दि.२८.०५.२०१५ रोजीचा छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझे पती अनिल भगवान सरकटे यांची सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येत आहे.

३. पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझे बयाण नोंदवून घेतले होते. ज्या लोखंडी रॉडने अजय सरकटे यांनी माझे पती अनिल सरकटे यांना मारहाण केली होती, तो

लोखंडी रॉड मला दाखविण्यास मी ओळखू शकते. आता मला एक लोखंडी रॉड दाखविण्यात आला, सदर रॉड तोच आहे ज्या रॉडने माझ्या पतीला मारहाण केली होती. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येत आहे. आरोपी अजय सरकटे आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. पी. उपर्वट यांचे मार्फत सुरुः</u>**

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुम्ही आणि तुमचे पती अनिल सरकटे हे एका घरात राहत होते आणि तुमचे साासू सासरे वेगळ्या घरात राहत होते ? |
| **उत्तरः** | नाही, घटनेच्यावेळी माझे सासू, सासरे, मी आणि माझे पती आम्ही सर्वजण एकाच घरात राहत होतो. |

४. मी ज्या घरामध्ये राहते त्या घराचा घर क्रमांक मला आठवत नाही. घटनेच्यावेळी आम्ही ज्या घरामध्ये राहत होतो ते घर माझ्या सासऱ्यांच्या मालकीचे होते. पोलीसांनी घटने विषयी माझ्याकडे चौकशी करुन माझे बयाण नोंदवून घेतले होते. माझी चौकशी करताना पोलीसांनी आम्ही राहतो ते घर कोणाच्या मालकीचे आहे, याबाबत कागदोपत्री पुरावा मागितला होता की नाही, हे आज रोजी मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेला अनेक वर्षे झाल्यामुळे घटना नेमकी काय घडली होती, ते आज रोजी मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोर्टात आल्यानंतर मला सदर घटने बाबत माहिती झाली.

५. माझे शिक्षण इ. १२ वी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराच्या आजूबाजूला इतरही ४–५ घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी अजय सरकटे यांच्या सोबत सदर घटनेच्या पुर्वीपासून आमचे पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी अजय सरकटे यांच्या नावाने कोणत्याही शेतीचा ७/१२ उतारा नाही. हे म्हणणे खरे आहे की, अजय सरकटे हे निंबा गावातील झोपटपट्टी मध्ये राहतात. बँक कशाच्या आधारे एखाद्या व्यक्तीला कर्ज देते या विषयी मला माहिती नाही.

६. माझे पती अनिल सरकटे हे मराठी मध्ये सही करीत होते. माझे पती कोणत्याही कागदपत्रांवर सही करीत होते, निशाणी अंगठा करीत नव्हते. हे म्हणणे खरे नाही

की, माझ्या पतीला उर्फ नाव नव्हते. मी स्वतःहुन सांगते की, अनिल उर्फ पिंटू असे नाव होते.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | पोलीस स्टेशन, उरळ येथे जाताना तुम्ही स्वतः रिपोर्ट लिहून तयार करुन गेला होता की पोलीसांनी पो.स्टे.मध्ये तुमचा रिपोर्ट लिहून घेतला होता ? |
| **उत्तरः** | पोलीसांनी पो.स्टे.मध्ये रिपोर्ट लिहून घेतला होता. |
| **प्रश्न :** | पोलीसांनी कोणत्या तारखेला तुमचे बयाण घेतले होते, ती तारीख सांगता येईल का ? |
| **उत्तरः** | दि.१०.०६.२०१५ रोजी पोलीसांनी माझे बयाण घेतले होते. |

७. हे म्हणणे खरे आहे की, माझे बयाण पोलीसांनी पोलीस स्टेशनमध्ये घेतले होते.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | लोखंडी रॉड आणि लोखंडी टॉमी यातील फरक तुम्हाला समजतो का ? |
| **उत्तरः** | मला जो रॉड दाखविण्यात आला त्यानेच माझ्या पतीला मारहाण केलेली आहे. |
| **प्रश्न :** | तुम्हाला दाखविण्यात आलेला लोखंडी रॉड तुमच्या पतीकडून तुमच्या घरुन पोलीसांनी जप्त केला होता ? |
| **उत्तरः** | आरोपीने रॉड तेथेच फेकला होता, तो पोलीसांनी जप्त केला आहे. |

जप्ती नाम्यावर माझ्या पतीची सही घेतली होती की नाही, मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीचा इलाज कोणत्या दवाखान्यात केला हे मला सांगता येत नाही.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुमच्या पतीच्या इलाज ज्या दवाखान्यात झाला त्या दवाखान्याचे नाव सांगा ? |
| **उत्तरः** | पोलीसांनी सरकारी दवाखान्यात नेले होते. |

८. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीला दवाखान्यामध्ये मी नेलेले नसून पोलीसांनी नेलेले आहे. मी स्वतःहुन सांगते की, त्यावेळी मी सोबत होते. हे म्हणणे खरे नाही की, १०–११ वर्षांपासून माझे व माझ्या पतीचे, माझ्या सासू–सासऱ्यांसोबत शेतीचा वाद सुरु आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीला दारुचे व्यसन होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.०५.२०१५ रोजी माझे पती घरी असताना दारु प्यायले आणि त्यावेळी ते तीक्ष्ण दगडावर पडून त्यांना डोक्याला जखम झाली.

९.     हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासादरम्यान आरोपी विरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी मी खोट्या सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०४.०७.२०२२ रोजी माझ्या पतीचे निधन झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला फसविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पुर्ण, दुपारी ०४.०५ वाजता.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०२.१२.२०२४**

**समक्ष**

**(विष्णु द. गिते)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

VISHNU DATTARAO GITE
Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2024.12.02 16:38:51 +0530

**(विष्णु द. गिते)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Shri. Vishnu D. Gite**<br>Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Ajay N. Hande |
| Date of Decision | :- | 02/12/2024 |
| Order signed by P.O on | :- | 02/12/2024 |
| Order uploaded on | :- | 02/12/2024 |